# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990






लातूर वर्ष ३ रे अंक २३४ वा सोमवार दि.१९ फेब्रुवारी २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# लोकनेते विलासराव देशमुख यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे थाटात अनावरण






लातूर : तालुक्यातील निवळी येथील विलास सहकारी साखर कारखाना परिसरात उभारण्यात आलेल्या माजी मुख्यमंत्री लोकनेते आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे अनावरण व विलास भवन या प्रशासकीय इमारतीचा शिलान्यास समारंभ काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, काँग्रेसचे गटनेते बाळासाहेब थोरात, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते आणि माजी मंत्री तथा सहकारमहर्षी आदरणीय दिलीपराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली आज संपन्न झाला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, माजी मंत्री शिवाजीराव मोघे, माजी मंत्री चंद्रकांत हंडोरे जी, माजी मंत्री सतेज पाटील जी, माजी मंत्री विश्वजित कदम, माजी आमदार उल्हास पवार, माजी आमदार मोहन जोशी, कल्याणराव काळे, माजी आमदार धनाजीराव साठे, आमदार राजेश राठोड, आमदार अभिजित वंजारी, आमदार कैलास गोरंट्याल, माजी आमदार दिलीपकुमार सानंदा, माजी आमदार विनायकराव पाटील, माजी आमदार दिनकरराव माने, माजी आमदार त्र्यंबक भिसे, माजी आमदार वैजनाथ शिंदे यांच्यासह देशमुख कुटुंबीय, मांजरा परिवारातील सदस्य आणि असंख्य लातूरकर यावेळी उपस्थित होते.

## भाजप दीडशेच्या वर जाणार नाही : प्रकाश आंबेडकर

वर्धा; पुढारी वृत्तसेवा : भाजप दीडशे जागांच्या वर जाणार नाही. ४०० जागांचा आकडा सांगणं हा स्वतःची समजूत काढण्यासारखं आहे. ते पूर्णपणे घाबरले आहे. म्हणून ते पक्ष फोडा असे करत आहे. स्वतःच घर सुरक्षीत ठेवण्यासाठी दुसऱ्याच्या घरावर बुलडोजर चालवणारा घाबरलेला असतो, अशी टीका वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी केली.वर्धा येथील विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी भाजपवर जोरदार टीका केली. यावेळी ते म्हणाले, भारतीय जनता पार्टी आणि आरएसएस असं दोन्ही म्हणतात आम्ही हिंदू धर्माचे प्रतीनिधी आहो. पहिला प्रश्न आमच्यासमोर येतो की बहुसंख्य पूर्णपणे हिंदू आहे आणि मग धार्मिक राजकारण कशासाठी याचा खुलासा मिळत नाही अशी परिस्थिती आहे. मागील दहा वर्षात जे वक्तव्य आणि कारवाई झाली त्यातून वैदिक परंपरा विरुद्ध संत परंपरा याची पुनरवृत्ती आताही दिसत आहे. संतांच्या विचारांनी आधारित जे संविधान आहे त्या विरोधात भाजप आणि आरएसएस दिसत आहे. उद्याच संविधान कस असेल या बद्दल ते चर्चा करत नाही पण जे सूचक वक्तव्य येते त्यातून हिटलरशाहीशी आधारित किंवा हिटलरशाहीला पुरस्कृत करणारी घटना असेल.१९५० ते २०13 पर्यंत देशाचं नागरिकत्व सोडणाऱ्यांची संख्या ७२०० होती. पण २०13 पासून आतापर्यंत २४ लाख कुटुंब तेही हिंदू कुटुंब ज्यांची मालमत्ता किमान ५० कोटी असेल अश्याना देश मजबूर करून देश सोडायला लावल. त्यांनीही नागरिकत्व सोडल आणि परदेशात जाऊन नागरिकत्व स्वीकारल. देशाचं नागरिकत्व सोडणारा वर्ग हा संत परंपरेला मानणारा होता, त्यांच्यासमोर अशी परिस्थिती केली की त्यांना नागरिकत्व सोडाव लागल. हिंदूंच्या राज्यात हिंदूंना देश सोडून जावं लागत, नागरिकत्व सोडून जावं लागत ही प्रचंड मोठी शोकांतिका आहे, अशीही टीका आंबेडकर यांनी केली.

## केंद्र सरकारची कांद्याच्या निर्यातीला परवानगी

तब्बल ७२ दिवसांनंतर केंद्र सरकारच्या समितीने कांदा निर्यात बंदी उठवण्याचा निर्णय घेतला असून ३ लाख मेट्रिक टन कांद्याच्या निर्यातीला मान्यता दिली आहे. यासोबतच बांगलादेशमध्ये ५० हजार टन कांदा निर्यातीलाही मान्यता देण्यात आली आहे. केंद्र सरकारने शेतकऱ्यांसाठी मोठा निर्णय घेतला आहे.कांद्याच्या निर्यातीवर घातलेली बंदी हटवण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना काहीसा दिलासा दिला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखालील मंत्र्यांच्या समितीने कांदा निर्यातीला मान्यता दिली आहे. पण यासंदर्भातील केंद्र सरकारचा अधिकृत निर्णयाची प्रत अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे कोणत्या कांद्याच्या निर्यातीला हिरवा कंदील मिळाला आहे हे अद्याप स्पष्ट नाही. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आल्याचा सूर शेतकऱ्यांमधून निघत असून आंतरराष्ट्रीय बाजारात कांद्याला मागणी असल्यामुळे या पूर्वीच हा निर्णय घ्यायला पाहिजे होता तर निर्यात बंदी उठवितांना फक्त ३ लाख मेट्रिक टन निर्यातीलाच परवानगी दिल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजगी आहे. देशातील कांद्याच्या वाढत्या किमतींवर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारने त्याच्या निर्यातीवर बंदी घातली होती. ३१ मार्च २०२४ पर्यंत निर्यात बंदी लागू करण्यात आली होती.






## संपादकीय....


# हेच खरे पालकत्व!

पालक नेहमीच चांगल्या गोष्टी, सवयी मुलांना शिकवतात. मात्र, त्याबरोबरच मुलांना वाईट गोष्टींपासून दूर न ठेवता वेळोवेळी त्यांची ओळख आणि त्यांच्या परिणामांची जाणीव मुलांना करून देणं हे पालक म्हणून आपलं कर्तव्य असते. या कर्तव्यपालनाविषयी.अनेक पालकांना वाटतं, की माझ्या मुलांना सगळ्या चांगल्याच सवयी असाव्यात. मात्र, वाईट सवयी मुलांमध्ये रूजू नयेत म्हणून आपण पालक म्हणून किती आणि कसे प्रयत्न करतो, हेही तेवढंच महत्त्वाचं. लहान मुलं अगदी छोट्या गोष्टींमधून आणि बहुतांशी मुलं फक्त पालकांच्या, भावंडांच्या निरीक्षणातूनच शिकत असतात. आपल्या वागण्यातून ते कोणती गोष्ट शिकणार आहेत, याची आपल्याला कल्पनाही नसते.

हट्टीपणाबाबतही तसंच म्हणता येईल; खरं तर मुलांपेक्षा पालकच जास्त हट्टी असतात. मुलांनी या वेळी हेच करावं हा आपलाच हट्ट असतो आणि मुलांनी तसं केलं नाही तर आपण मुलांना हट्टीपणाचं लेबल चिकटवून रिकामे होतो. याप्रमाणेच मुळातच लहान मुलांना भीती म्हणजे काय हेच ठाऊक नसते, आपणच त्यांना आपले काम सोपे व्हावे म्हणून एखाद्या गोष्टीची काल्पनिक भीती तयार करतो. एकदा भीती त्यानं स्वीकारली, की नंतर आपणच त्याला भित्रा–घाबरट असं टोपण नाव ठेवून रिकामे होतो.काय करता येईल?आपण बाहेर जाताना मुलांना जे खरं असेल ते सांगता येईल. त्यामुळे मुलांना सत्य परिस्थिती स्वीकारण्याची सवय लागेल आणि आपल्यावर खोटं सांगण्याची वेळ येणार नाही. कितीही महत्त्वाचे असेल तरी जेवताना पालकांनी स्वतः मोबाईल आणि टीव्ही पाहणे टाळावे म्हणजे आपसूकच ती सवय मुलांनाही लागेल. एखाद्या गोष्टीची भीती दाखवून ते काम करवून घेण्यापेक्षा त्याला निडर बनवावे.प्रत्येक कृतीचे महत्त्व किंवा त्या गोष्टीचा फायदा मुलांच्या लक्षात आणून द्यावा. हा बदल एका दिवसात होणार नाही, पण सातत्याने नक्कीच फरक दिसू लागेल. मुलांनी सगळ्या गोष्टी त्या–त्या वेळेत कराव्या असं वाटत असल्यास त्या सवयी आपण त्यांच्याकडून अगदी सुरुवातीलाच ठराविक वेळेत करवून घेतल्या पाहिजेत.सुरुवातीच्या ४–५ दिवसांनंतर मुलं स्वत:हूनच हा दिनक्रम अंगीकारतील. झोपण्याची वेळ निश्चित करायला हवी, त्यासाठी निश्चित वेळेस घरातील दिवे बंद व्हायलाच हवेत. जेणेकरून झोपण्याव्यतिरिक्त त्यांच्याकडे पर्याय राहणार नाही आणि लवकर झोपल्यामुळे सकाळी जागही लवकर येईल. सध्याच्या काळात मुलांसोबत वेळ घालवणं, त्यांच्याशी सुसंवाद साधणं खूप महत्त्वाचं ठरतयं. मुलांसोबत वेळ घालवणं यासारखी चांगली गुंतवणूक नाही. आपल्या मुलांसोबत आपणही नवनवीन गोष्टी शिकण्यासाठी आतुर असलेलं एक लहान मूल व्हायला व्हावं. आपल्या लहानपणी काही कारणानं शिकायच्या राहून गेलेल्या गोष्टी आपण मुलांसोबत शिकू शकतो.मुलांना मोबाईलपासून दूर ठेवणं म्हणजे त्यांना आधुनिक तंत्रज्ञानापासून दूर ठेवणं. ज्यामुळे ती समाजापेक्षा खूप मागे पडतील ही भीती बऱ्याच पालकांना वाटत असते. पण अशी कोणतीही भीती मनात बाळगण्यापेक्षा पालक म्हणून हा विषय थोडा हुशारीने आणि जागरूकतेने हाताळायला पाहिजे. गरजेपुरताच आणि नियोजित कालावधीसाठी मोबाईलचा वापर करण्याची सवय आधी पालकांनी स्वतः अंगीकारावयास हवी.तसेच काळानुसार पालकांनीही थोडं बदलायला हवं. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर पालकांनाच करता येत नसल्यास त्यांनी आधी तो शिकून घ्यायला हवा आणि मग मुलांना शिकण्यास किंवा वापर करण्यास प्रवृत्त करावं. पालक म्हणून आपण नेहमीच एक पाऊल पुढे असायला हवं..मुलं बऱ्याच वेळा असं काहीतरी बोलतात आणि पालकांना प्रश्न पडतो, हे याला कोणी शिकवले? पण चुकीच्या गोष्टी शिकायला मुलांना अजिबातच वेळ लागत, नाही पण तीच चुकीची गोष्ट मनातून काढून टाकायला मात्र खूप वेळ लागतो. या प्रक्रियेमध्ये पालकांची सहनशीलता, संयम पणास लागतो, त्यात कधीतरी हा संयम सुटल्यास परिस्थिती अजूनच कठीण होऊन बसते. त्यामुळे घरात मुलांसमोर कोणतीही गोष्ट बोलताना, सांगताना अत्यंत काळजी घेणं आवश्यक आहे.

# गुलामीच्या श्रृंखला तोडणारा : छत्रपती शिवाजी

जनमानसात शिवकार्या संबंधी जी काही स्थुल कल्पना असते, त्यापेक्षा महात्मा फुल्यांची कल्पना फार वेगळी होती अर्थात एक लोकोत्तर शुरवीर पुरुष, जन्मजात जननेता, स्वराज्य संस्थापक, लोककल्याणाची सदैव काळजी वाहणारा राज्यकर्ता या विविध नात्यांनी शिवाजीची व शिवकार्याची जी महती आहे, ती फुल्यांना नि:संशय मान्य होती. परंतू शिवाजी हा हिंदूधर्मरक्षक होता, त्याचे राज्य हे हिंदू धर्मराज्य होते. तो गोब्राम्हण प्रतिपालक, क्षत्रीय कुलावतंस छत्रपती होता. अशी शिवकार्याची महती काहीजणांकडुन सतत आणि पध्दतशीर पणे मांडण्यात येते ती महात्मा फुल्यांना अजिबात मान्य नव्हती आणि त्यांना त्याबद्दल कौतुकही नव्हते.



छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन म्हणजे एक दैवी चमत्कार होता. त्यांची आई जिजाबाई ही लखुजी जाधवराव या निजामशाहीतील शुरसरदाराची मुलगी तर वडील शहाजीराजे भोसले हे स्वकर्तृत्वाने सामर्थ्यवान असलेल्या मालोजीराव भोसले यांचे चिरंजीव. राजकारणात मुरलेल्या व आनंदाचा उन्मेश बाळगणा–या माता–पित्यांच्या पोटी शिवाजींचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० यावर्षी वैशाख शुध्द द्वितीय जुन्नर जवळील शिवनेरी या किल्यावर झाला. त्यामुळे शिवाजी महाराज हे महाराष्ट्रातल्याच नाहीतर अखिल भारतातल्या प्रत्येकाचे स्फुर्तीदायी दैवत आहे.

शिवाजीला लढाईचे आणि राज्यकारभाराचे शिक्षण दादोजी कोंडदेव यांनी दिले. दहा–बारा वर्षाचा असतानाच शिवाजींच्या मनात स्वातंत्र्याचे वारे खेळू लागले. माझा देश मोगलांच्या आणि मुसलमानांच्या गुलामीतून मुक्त करायचा, माझ्या बांधवांना गुलामीतून आणि छळातून सोडवायचे. शिवाजींनी सफद्रीच्या कडेकपारीत भटकून सवंगडी गोळा केले. तानाजी, नेताजी, सुर्याजी, बाजी, वेसाजी असे एका पेक्षा एक जिवाला जीव देणारे मित्र गोळा केले. श्री रोहिडेश्वराच्या साक्षीने स्वराज्याची शपथ घेतली आणि एका स्वरात घोषणा दिली. 'हर हर महादेव' महाराष्ट्रातल्या मावळखोऱ्या पासुन त्यांनी आपल्या लढयाला आरंभ केला. साम–दंड–भेदांचा उपयोग करत अवघ्या चौदाव्या वर्षी शिवाजीनी 'तोरणागड' जिंकून स्वराज्याचे तोरण बांधले. मग त्यांनी मागे वळुन पाहिलेच नाही एका मागून एक गड आणि किल्ले जिंकून घेतले. युध्दात शक्तीपेक्षा युक्तीच्या वापर जास्त केला. राक्षसी देहाचा अफजलखान भेटीचे ढोंग करुन शिवाजींचा घात करायला आला होता.

त्यांनी पारतंत्र्यातून स्वातंत्र्याकडे जाण्यासही प्रेरणा मिळावी असे आपले चरित्र घडविले आणि एक मोठा आदर्श निर्माण केला कोणत्याही कार्याचा आरंभ लहानशा मर्यादेत होतो आणि पुढे ते कार्य मोठया मर्यादेत गेलेले आढळते. पवित्रगंगेचा उगम आणि पुढे तिचा झालेला विस्तार हे उदाहरण या दृष्टिने लक्षात घेण्या सारखे नाही कां ? तर शिवाजी महाराजांचे कार्य जरी आरंभी महाराष्ट्राच्या विविध विषयाचा विरोध प्रकट करुन स्वराज्य स्थापनेच्या प्रयत्नापुरता मर्यादित असला तरी लोकांच्या मनात जी स्वातंत्र्यप्रेमाची ज्योत पेटली त्यामुळेपुढे भारतात दक्षिणोत्तर ती प्रेरणा निर्माण झाली.

१३ व्या शतकांत देवगीरीच्या यादवांची सत्ता संपविणाऱ्या परधर्मी काही सत्ताधिशांनी महाराष्ट्रावर पुढे दोन–तीनशे वर्षे सत्ता गाजविली. जसजशी त्यांची सत्ता मजबूत होत गेली, तसतशी त्यांच्यातली जुल्मी प्रवृत्ती वाढीला लागली. आपल्या प्रजेवर अन्यायाने कर लादणे, त्यांची घरे दारे आणि जमिनी बळकाविणे, स्त्रियांची अब्रू लुटणे आणि गुलाम म्हणून प्रजेला राबवणे असे प्रकार सुरु झाले. सारी मराठी माणसे मनातून या जुलूमी सत्तेवर रागावली होती, पण म्हणतात ना सत्ते पुढे शहाणपण चालत नाही – तशी अवस्था होती. औरंगजेब हा जबरदस्त लष्करी सामर्थ्यांचा, पराक्रमी, कट्टर मुसलमानपंथीय व दक्षिणेतील राजकारणाची माहिती असलेला बादशाह होता. पण शिवाजीने अफझलखान सारख्या पराक्रमी मुसलमान सरदारास यमसदनी पाठविल्यानंतर तो जिवंत असे पर्यंत महाराष्ट्रात येण्याची त्याची छाती झाली नाही. औरंगजेबाने शिवरायांना पकडून आग्रा येथे ठेवले, पण तेथूनही ते शिताफीने निसटले, तेव्हा औरंगजेबाने त्यांचा धसकाच घेतला.



स्वदेश स्वतंत्र व्हावा ही माता–पित्यांची इच्छा शिवाजीने पूर्णकेली. हिंदु धर्माचा पाडाव करुन सर्व हिंदुस्थान मुसलमानमय करुन टाकावाया महत्वाकांक्षेने झपाटलेला औरंगजेब हा दिल्लीच्या तख्तावर होता. विजापूरची आदिलशाही, अहमदनगरची निजामशाही, गोवलकोंडयाची कुतुबशाही अशा वेढयात सापडलेला पूणे–सुपे परिसर या तिन्ही मुस्लिम राज्यांवर औरंगजेबाची हुकूमत होती. तो दिल्लीहून सतत त्यांना सैन्य व पैसा पुरावत होता. माता जिजाऊंनी शिवाजीराजांच्या मनात या अन्यायकारी वृत्ती विषयाचा विरोध आणि बीज निर्माण करुन स्वांतत्र्य आणि स्वराज्य या विषयींच्या निष्ठा निर्माण केल्या. शिवाजीराजांच्या अंगभूत गुणांचा विकास केला आणि हळूहळू शिवाजीराजे त्या दिशेने प्रयत्न करु लागले. मराठी माणसांच्या मनातल्या रागाला नेमकी दिशा दाखविण्यासाठी त्यांनी 'मराठा तितुका मेळवावा' हे सुत्र धरुन स्वातंत्र्यप्रेमी, पराक्रमी आणि निष्ठावान माणसांना एकत्र केले. यावेळी त्यांच्या लक्षात आले की, काही स्वार्थी मराठी माणसे सरदारकी, जहागिरी आणि मोठया हुद्यासाठी परक्या सत्ताधिशांच्या चाकरीत धन्यता मानून शिवाजीराजांच्या स्वातंत्र्य लढयाला विरोध करत होते.

रायगडावर भेट ठरली, मिठी मारण्याचे सोंग करुन त्यांने शिवाजीवर तलवार चालवली. पण शिवाजी सावध होताच हातात लपविलेल्या वाघ नखांनी अफजलखानाचा कोथळाच बाहेर काढला. पळून गेला म्हणून शाहिस्ते खान भेटला, शिवाजी महाराज स्वराज्य निर्माण करतांना येणाऱ्या प्रत्येक संकटाला जोमाने सामोरे गेलेच पण त्यांचे संवगडीही त्यांना समर्थ साथ देत होते. सिंहगड सर करतांना तानाजी पडला. खिंड लढवितांना बाजीप्रभुने छातीचा कोट केला. महाडकर, प्रतापराव गुर्जर अशा एकाहुन एक शुर संवगड यांनी आपलं मत दिले. आपले प्राण दिले. तेव्हा स्वराज्य आकाराला आले. स्वराज्यात आता ८५ किल्ले आणि दोनशे चाळीस गड आहेत.

लोकांनी शिवाजी महाराजांना राज्यभिषेक करवून घेण्याचा आग्रह केला. महाराजांनी आपल्या मातेशी आणि जवळच्या सरदारांशी चर्चा करुन राज्यभिषेक करवून घ्यायचा असे ठरवले. काशीचे प्रसिध्द पंडीत गागाभट्ट धार्मिक विधी करण्यासाठी आले. स्वराज्याची राजधानी रायगड ठरली. शिवाजी राजा सिंहासनावर बसला. लोकांनी जयजयकार केला, छत्रपती श्री शिवाजी महाराज की जय' शिवाजी महाराजांनी आपले जीवन देव, देश आणि धर्म यासाठी वेचले. संत तुकाराम हे त्यांचे आध्यात्मिक गुरु होते तर संतरामदास हे त्यांचे राजकीय गुरु होते. शिवाजी महाराजांचा राज्यभिषेक ६ जून १६७४ साली रायगडावर झाला. त्यानंतर थोडयाच काळात म्हणजे ६ वर्षानंतर ३ एप्रिल १६८० मध्ये शिवाजी महाराजांचे रायगडावर निधन झाले. रामदासांनी त्यांचे गुणगौरव करतांना म्हटले,

निश्चयाच्या महामेरु । बहुत जणासी आधारु ।।
अखंड स्थितीच्या निर्धारु । श्रीमंत योगी ।।

इतिहासाच्या पानावररयतेच्या मनावरमातीच्या कणावर–आणि विश्वासाच्या प्रमाणावर राज्य करणारा राजा म्हणजे, राजा शिवछत्रपतींच्या ३९५ व्या जयंती निमित्त मानाचा मुजरा !

***********

**प्रवीण बागडे**
**जरीपटका, नागपूर – १४**
**भ्रमणध्वनी – ९९२३६२०९१९**
**ई–मेल र्गिंळपलरसवशसारळश्र.लो**

# छत्रपती शिवरायांना जाती धर्मात बंदिस्त करू नका..!

महाराष्ट्र हे राज्य संत महापुरुष आणि राजे महाराजे यांची भूमी म्हणून देशभर ओळखले जाते हे राज्य पुरोगामी राष्ट्र म्हणूनही देशभर सुपरीचीत आहे.शिवरायांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० सालचा तर मृत्यू ३ एप्रिल १६८० सालचा. वयाच्या पंधराव्या वर्षी रायेश्वर गडावर महाराजांनी स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली. तेथून सुरू झालेला हिंदवी स्वराज्य स्थापनेचा प्रवास ६ जून१६७४ रोजी महाराजांच्या राज्याभिषेकाने थिरावला. धर्मशास्त्राने लादलेली बंधने, पुरूषप्रधान संस्कृती आणि परकीय राज सत्तेचे आक्रमण या तीन वरवट्याखाली भरडलेल्या भारतीय स्त्रि जीवनाचा सन्मान,आदर व आत्मविश्वास बहाल करण्याचे ऐतिहासिक कार्य छत्रपती शिवाजी महाराजांनी केले. महिलांना दासी भटकली म्हणून विकू नये. असा आदेश देणारा लोक कल्याणकारी राजा आजच्या विज्ञान काळात देखील आश्चर्यचकित करून समाजाला सोडतो. संत तुकारामांचे विचार प्रमाण मानून पराविया नारी माऊली समान मानणारे छत्रपती शिवराय होते. शिवाजी महाराजांच्या सैन्यामध्ये सर्व जाती धर्माचे सैनिक होते. जसे दौलत खान आरमार प्रमुख, नौकर मदारी मेहतर, वकील काजी हैदर, सैन्य प्रमुख नूर खान बेग, अंगरक्षक सिद्धी इब्राहिम, तोफखाना प्रमुख इब्राहिम खान, चित्रकार– मीर मोहम्मद आज शिवरायांचे जे प्रचलित चित्र आहे ते मीर मोहम्मद यानेच काढलेल्या मूळ तेलचित्रावरूनच काढले जातात.हे चित्र पॅरिस येथील संग्रहालयात आहे. हे चित्र नसते तर कदाचित शिवरायांचे आणखीनच देवीची करण झाले असते. असे अनेक शिवशाहीचे स्वाभिमानी शिलेदार मुस्लिम सुद्धा होते. जीवा महाला सपकाळ हा सैनिक जातीने नाभिक (न्हावी) समाजाचा होता. किल्लेदार महार हेर प्रमुख बहिर्जी रामोशी, आरमार सरदार मायनाक भंडारी, कावजी मल्हार, कान्होजी झेंडे, खंडोजी पाटील, बाजीप्रभू देशपांडे, अशाअनेक शिवशाहीच्या शिलेदारांनी स्वराज्यासाठी आपले बलिदान दिले. आजही काही अपवाद वगळता अनेक पत्रकार, कवी, लेखक, व्याख्याते शिवरायांना मराठ्यांचे योद्धे, हिंदू धर्म रक्षक, गोब्राह्मण प्रतिपालक शिवाजी महाराज हे मुसलमानाच्या विरुद्ध होते. त्यांचे जीवनकार्य मुसलमान धर्माचा प्रतिकार करणे हे होते . शिवाजी महाराज धर्मासाठी लढले ,ते परमेश्वरांचा अवतार होते. शिवाचा अवतार होते, म्हणूनच ते युद्ध जिंकले धर्म रक्षणासाठीच त्यांना भवानी मातेने तलवार दिली शिव कार्याचा आधार धर्म नसता तर शिवाजी महाराज यशस्वी झाले नसते इत्यादी अनेक समज जनमानसात मनुवादी व्याख्याते विस्तृत प्रमाणात खोटे शिवचरित्र सांगतात. मात्र सुशिक्षित सुजाण शिवसैनिकांनी ऐतिहासिक सत्याच्या आधारावर हे सर्व प्रमेय नीट इतिहास शिवचरित्र तपासून घ्यायला हवेत. खऱ्या अर्थाने जाती धर्माला आणि अंधश्रद्धेला मूठ माती देणारे छत्रपती शिवाजी महाराज होते.ते धर्मनिरपेक्षेवादी राजे होते. त्यांनी कधीही जाती धर्माला विरोधक मानले नाही. तर आपल्या राजदरबारात सर्वांना समतेची वागणूक दिली. राज दरबारात अन्याय अत्याचार होणार नाही याची ते सातत्याने काळजी घ्यायचे म्हणूनच शिवरायांना जाणता राजा म्हणूनओळखल्या जाते . युद्ध हे तलवारीच्या बळावर जिंकल्या जात नसून ते मनगटाच्या जोरावर आणि सामर्थ्यावर लढल्या जाते, जिंकल्या जाते .हे शिवरायांनी स्वतः च्या कृतीतून जगाला दाखवून दिले आहे. म्हणून शिवरायांना जातीत बंदिस्त करणे चुकीचे आहे. शिवराय एका जाती–धर्माचे असते तर त्यांनी आपल्या सैन्यामध्ये मुस्लिम सैनिकांना स्थानच दिले नसते. हे शिवप्रेमींनी समजून घ्यावे. शिवजयंतीच्या निमित्ताने गावागावात सर्व जाती धर्मातील लोकांना एकत्र जमवून खरे शिवचरित्र सांगितले गेले पाहिजे सर्वांना समतेची वागणूक देऊन शिवचरित्र प्रत्येक घराघरात मनामनात पोहोचले पाहिजे. त्यांना जाती–धर्मात बंदिस्त करू नका हिच शिवप्रेमींना कळकळीची विनंती. शिवरायांचे जीवन चरित्र समाजाला भीषण अंधकारमय परिस्थितीतून निश्चितच बाहेर काढून प्रेरणादायी ठरणारे आहे. शिवरायांच्या गौरवशाली इतिहासाच्या जागरातून आपल्यात राष्ट्रभक्तीची गुणसंपन्न पिढी निर्माण व्हावी आणि त्यातूनच छत्रपती शिवाजी महाराज आणि जिजाऊ साहेबांच्या स्वप्नातला आदर्श समाज आदर्श राष्ट्र घडवावे हीच शिवजयंतीची शिवप्रेमींना मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा...



*********

लेखक –सिद्धार्थ तायडे
मु. पो. वडनेर भोलजी
ता. नांदुरा
जि. बुलढाणा
मो. नं.९३०९७६७३८८

# संपूर्ण गडकिल्ले भारताचे शिव वैभव असल्याने केंद्र व राज्य सरकारने जोपासना करावी.

छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती हा एक महाराष्ट्राचा उत्सवाचा सन आहे.त्यामुळे १९ फेब्रुवारीला संपूर्ण महाराष्ट्रभर साजरा केल्या जातो.सन १८६९ साली महात्मा जोतिबा फुले यांनी रायगडावरील शिवाजी महाराजांची समाधी शोधून काढली व त्यांच्या जीवनावर सर्वप्रथम पोवाडा लिहिला. शिवाजी महाराजांचे कार्य लोकांपर्यंत पोहोचावे यासाठी फुलेंनी सन १८७० साली शिवजयंतीची सुरूवात केली. ती पहीली शिवजयंती होती.त्यानंतर शिवजयंतीच्या माध्यमातून लोकांना एकत्र करण्याचे काम लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी केले. २० व्या शतकात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी देखील शिवजयंती साजरी केली व दोन वेळा शिवजयंतीच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या थाटात शिवजयंतीला सुरूवात झाली.महाराष्ट्र सरकारने २००१ पासून शके १५५१ (शुक्रवार १९फेब्रुवारी १६३०) ही शिवजयंतीची तारीख स्वीकारली त्यानुसार महाराष्ट्र सरकारने १९ फेब्रुवारी सार्वजनिक सुट्टी जाहिर केली. इतर संभाव्य तारखांमध्ये ६ एप्रिल १६२७ (वैशाख शुद्ध तृतीया) ही जन्म तारीख मानली जाते. त्यानुसार महाराष्ट्राबाहेर अनेक लोक शिवजयंतीचा दिवस म्हणून वैशाख शुद्ध तृतीया हा दिवस मानतात. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या दिनदर्शिकामध्ये शिवजयंतीची वेगवेगळी तारीख दाखवीली आहे. महाराष्ट्रात शिवजयंतीच्या तारखेला महत्व नसुन त्यांचे कर्तुत्व,त्यांचा त्याग,रयतेची जबाबदारी आणि लाखोंनी सैन्य घेऊन चढाई करणाऱ्या मोगल साम्राज्याचा अंत करणे हे महत्वाचे आहे.मी तर म्हणेल की शिवजयंती रोज साजरी व्हावी आणि शिवाजी महाराजांचे गोडवे जनतेपर्यंत पोहचवावे.तेव्हाच भारतात एकच नाही तर लाख शिवा तयार होतील. कारण शिवाजी महाराजांच्या पुण्यांयीनेच आज आपण ताठ मानाने आणि स्वाभिमानाने जगत आहो. गनीमीकाव्याने मोगलायीचा व मोगल साम्राज्याचा अंत केला व हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. याचा गर्व महाराष्ट्रासह संपूर्ण भारताला आहे. आज भारताची गौरव गाथा जी आपण ऐकतो त्याचे संपूर्ण श्रेय शिवरायांनाच आहे.शिवाजी महाराज म्हणजे महाराष्ट्रासह संपूर्ण भारताची अबाध्य शक्ती आहे. शिवजयंतीच्या निमित्ताने शिवाजी महाराजांचे विचार समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहचले पाहिजे.जानता राजा, रयतेचा राजा,हिंदवी स्वराज्याचे संस्थापक म्हणून जगभर ख्याती प्राप्त आहे. त्यामुळे केवळ महाराष्ट्रातच किंवा भारतातच नव्हे तर संपूर्ण जगभरात शिवाजी महाराजांचे नाव आदराने घेतले जाते. तत्वज्ञ, इतिहासकार शिवाजी महाराजांवर अभ्यास करण्यासाठी भारतात येतात. १९ फेब्रुवारी रोजी सुमारे १११ पेक्षा अधिक देशांमध्ये शिवाजी महाराजांची जयंती साजरी केली जाते.असे सांगण्यात येते की शिवाजी महाराजांकडे अनेक जातीवंत घोडे सुध्दा होते.कोणत्या घोड्यांचा वापर केव्हा करायचा हे त्यांना चांगलेच अवगत होते.शिवाजी महाराजांकडे मोती, विश्र्वास,तुरंगी, इंद्रायणी,गाजर,रणभीर,कृष्णा असे ७ घोडे होते. शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करतांना सुमारे ४०० गड आपल्या अधिपत्याखाली आणले होते. काही गड त्यांनी स्वत: बांधले तर काही किल्ले लढाया करून जिंकले.महाराजांचा एक गडकिल्ला म्हणजे स्थापत्यशास्त्र, व्यवस्थापन आणि गनिमी काव्याचे प्रतिकच होते. त्यामुळे मी केंद्र व राज्य सरकारला आग्र करतो की महाराष्ट्रातील संपूर्ण गडकिल्ल्यांची देखरेख करून सुसज्जीत केले पाहिजे. यातच शिवरायांना खरा मानाचा मुजरा ठरेल.कारण महाराष्ट्रासह संपूर्ण भारतातील गडकिल्ले ही भारताची धरोहर व शान आहे. कारण गडकिल्ल्यामुळेच शिवरायांच्या आठवणी पुन्हापुन्हा जागृत होतील. गडकिल्यांची सुरक्षा म्हणजे शिवजयंतीच्या निमित्ताने महाराजांना खरे अभिवादन व मानवंदना ठरेल. कारण शिवरायांनी मुठभर मावळ्यांच्या साक्षीने हिंदवी स्वराज्याची स्थापना केली व संपूर्ण किल्ले काबीज केले हा अभिमान महाराष्ट्रासह संपूर्ण भारताला आहे.त्यामुळे इतिहास जागृत ठेवण्यासाठी संपूर्ण किल्ले पर्यटनाच्या दृष्टीने व शिवरायांची आठवण या उद्देशाने किल्ल्यांचे जतन करणे गरजेचे आहे. कारण शिवाजी महाराज रयतेचे राजा होतेच.त्याचप्रमाणे त्यांच्यात दैवी शक्ती सुध्दा होती. ३९४ वर्षांनंतर आजही कुठल्याही गडकिल्ल्यांवर गेले तर ४ हजार फूट उंचीवर भर उन्हाळ्यात आपल्याला किल्ल्यावर स्वच्छ पाणी प्यायला मिळते.हा संपूर्ण शिवरायांचाच प्रताप आहे.असे सांगण्यात येते की वयाच्या १७ व्या वर्षी शिवरायांनी स्वत: डिझाईन करून रायगड किल्ला बांधल्याचे सांगण्यात येते.आई जगदंबेच्या आशीर्वादाने शिवाजी महाराजांनी आपले संपूर्ण काम फत्ते केले व मावळ्यांमध्ये उर्जा निर्माण करून मोगलांना भुईसपाट केले.अबझल खानासारख्या महाकाय शक्तीशाली सरदाराला गनीमीकाव्याने यमलोक पोहचवीले. अशाप्रकारे मोगलांच्या संपूर्ण सरदारांना एक–एक करून धाराशाही करण्याचे काम शिवरायांनी व त्यांच्या सरदारांनी आणि मावळ्यांनी केले. हा देश साधुसंतांचा,थोरमहात्म्यांचा, क्रांतीकारकांचा व हिंदवी स्वराज्याची स्थापना करणाऱ्या शिवरायांचा देश आहे.याची जोपासना महाराष्ट्र व केंद्र सरकारने करावी अशी मी आग्रहाची विनंती करतो.महाराष्ट्रातील १२ गडकिल्ले युनेस्कोकडे नामांकनासाठी पाठविले आहे ही महाराष्ट्रासाठी व भारतासाठी आनंदाची गोष्ट आहे.यामुळे जागतिक वारसा यादीत भारताचे नाव समाविष्ट होऊन पर्यटनाला चालना मिळण्यास मदत होईल.देशात वाढते अत्याचार रोखण्यासाठी, महागाई,शेतकरी व कामगारांच्या समस्यांचे निवारण करण्यासाठी शिवरायांच्या तत्त्वांच्या अनुकरणाचा वापर करून केंद्र व राज्य सरकारने रयतेच्या सुरक्षेची व सुख–समृध्दीची जबाबदारी स्वीकारावी. यातच खरे शिवजयंतीचे महत्त्व दिसून येईल.त्याचप्रमाणे शिवजयंतीच्या निमित्ताने महाराष्ट्र सरकारने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपन करायला हवे.यामुळे संपूर्ण गडकिल्ले सुशोभित होईल व जिकडे–तिकडे आपल्याला हिरवा गालीचा दिसून येईल. त्याचप्रमाणे शिवजयंतीच्या निमित्ताने प्रत्येक व्यक्तीने जर वृक्ष लागवड केली तर प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात, फळात आपल्याला शिवाजी महाराजांचे दर्शन अवश्य होईल व त्यांच्या आठवणी अनंत काळापर्यंत टीकुण राहील.त्यामुळे शिवजयंतीचे औचित्य साधून सरकार, राजकीय पक्ष, सामाजिक संघटना,शिव भक्त व देशातील नागरिक यांनी प्रत्येकांनी एक तरी झाड लावले पाहिजे. यामुळे वाढत्या प्रदूषणावर मात करण्यास मोठी मदत होईलच. त्याच प्रमाणे गुरांना चारा व संपूर्ण जीवसृष्टीला ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल. त्यामुळे एकाच दिवशी लाखो झाडे लावल्या जातील ही झाडे अनेक युगांपर्यंत सर्वांच्याच स्मरणात राहिल. छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९४ व्या जयंतीनिमित्त माझा मानाचा मुजरा.



***********

**हर हर महादेव**
**= जय शिवाजी=**

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# रयतेचे राजे छत्रपती माझे..

लोकशाहीमध्येही ज्या राजाचा गौरव होतो त्यापैकी एक महत्वपुर्ण नाव म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होय. चारशे वर्षा नंतरही छत्रपती शिवाजी महाराज यांचा आदर जनतेच्या मनात आहेत. याचे एकमेव कारण म्हणजे त्यांचे कार्य. ते राजे असले तरीही त्यांनी राजेशाही राबवली नाही. स्वतः राजा असुन जनतेची काळजी घेऊन जनकल्याण करणारा राजा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होत. देशात अनेक राज घराणे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अगोदर होते. परंतू राजेशाही मध्ये वेगवेगळ्या माध्यमातून जनतेची लुट होऊन जनतेवर वेगवेगळ्या प्रकारचे अत्याचार होत होते. जनतेचा आणि राजाचा कधीच संबंध नसलेले आणि राजाच्या जवळचेच लोक अन्याय अत्याचार करून जनतेची लुट करत असत अशा वेळी न्याय कोणाकडे मागायचा हा मोठा प्रश्न जनतेसमोर उभा होता. म्हणून राजेशाही मध्ये जनता गुलामा सारखे जिवन जगत होती. राजाचा आदेश म्हणून कोणत्याही प्रकारच्या बंधनात अडकून राहण्याची सवय जनतेला झाली होती. राजेशाही चे बंधने वेगळे होती आणि भारतातील सामाजिक व्यवस्थेचे बंधने वेगळे होती. म्हणजे जनता दुहेरी गुलाम होती. राजाकडे शारिरीक गुलामी तर येथील विषमतावादी व्यवस्थेकडे मानसिक गुलामी. देशात अनेक राजे आले गेले त्यांनी वेगवेगळ्या भागात वेगवेगळे राज्य जरी केले, प्रत्येकांचे राज्य करण्याचे नियम जरी वेगळे असले तरीही भारतीयांना मानसिक गुलामी चे बंधने भारत भर सारखेच होते. माणसिक गुलामी लादणारे एकाच विचार सरणीचे होते. म्हणून राजाकडून जनतेचे शोषण व्हायचे ते वेगळे आणि माणसिक गुलामीच्या माध्यमातून जनतेचे शोषण व्हायचे ते वेगळे. परंतु छत्रपती शिवाजी महाराज यांच्या रुपाने एक राजा राजेशाही चे बंधने आणि सामाजिक विषमतेची बंधने तोडून टाकून खऱ्या अर्थाने आदर्श लोक कल्याणकारी राज्यांची संकल्पना तयार करून त्या विचाराची पेरणी करतात. राजा हा जनतेचा शोषण करणारा नसुन रयतेचा पालण पोषण करणारा आहे ही भावना जनमानसात छत्रपती शिवाजी महाराज यांनी रुजवली. सामाजिक व्यवस्था ही विषमतेवर आधारित होती. जातीची उतरंड तयारी करून विकृत मानसिकतेचे लोक स्वतः ला श्रेष्ठ समजत होते. स्वतः च स्वतःला श्रेष्ठ समजणारे किती भ्रष्ट असतात हे नव्याने सांगण्याची गरज नाही. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या रुपाने राजेशाही गुलामी व मानसिक गुलामी दुरू होऊन माणसाला सुखाचे दिवस यायला सुरवात झाला. एक गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे ती म्हणजे राजा ज्या प्रांताचा असतो त्या प्रांतातील सर्व जनता हि त्याच राजाचा असते. म्हणजे राजा हा आपल्या प्रांतातील जनतेच्या विरोधात नसतो. राजाचा संघर्ष हा जनतेशी नसुन विरोधी राजांशी असतो मग तो जातीने धर्माने कोणीही असो. हीच गोष्ट समजने खुप महत्त्वाचे असते. कोणताही राजा जाती धर्माच्या विरोधात कधीच नसतो हे समजून घेणे आवश्यक आहे. राजा विचाराचा विरोधात असु शकतो. जर राजाला धर्माच्या विरोधात असते तर कृष्णा कुलकर्णी अफजल खानाचा वकील कसा झाला असता यावर प्रामाणिक चिंतन होणे आवश्यक आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी अठरा पगडजाती एकत्र करून मावळा ओळख दिली आणि जातीभेदाला मुठमाती दिली. सैन्यामध्ये सर्व जातीधर्माच्या लोकांना समान वागणूक दिली. शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडवण्यासाठी राजे असूनही प्रयत्न केले. शेतसारा गोळा करण्याच्या नावाखाली जी लुट होत होती ती लुट थांबवली. दुष्काळ सारख्या परिस्थिती



मध्ये शेतकऱ्यांना कृषी उपयोगी साहित्य देऊन कृषीउत्पन्नासाठी सहकार्य करून कृषीमाल आल्या नंतर त्याची योग्य ती वसुली करून शेतकऱ्यांना मोठा आधार देण्याचे काम केले. युद्धासाठी किंवा इतर कोणत्याही कारणाने सैन्याला एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जायचे असेल तर हत्ती घोडे किंवा इतर काही प्राण्यांसाठी रस्त्याने चारा वैरण लागत असताना कोणत्याही शेतकऱ्यांना त्रास न देता चारा वैरण शेतकऱ्यांकडून विकत घेण्याची व्यवस्था निर्माण करून शेतकऱ्यांना आर्थिक सक्षम करण्याचे काम केले. सैन्यासह इतर कोणीही रस्त्याने ये जा करत असेल तर कोणत्याही शेतकऱ्यांला त्रास न होता त्यांच्या कोणत्याही पिकाला धक्काही न लागता येजा व्हावी असे फर्मान सोडून जनतेला ही जागृत करणारे छत्रपती शिवाजी महाराज होते. राजेशाही अजूनही जनतेला बोलता येत होते, राजाकडून अडीअडचणीला मदत होत होती. महिलांना मान सन्मान सोबत संरक्षण मिळत होते. रयतेला न्याय हा जात धर्म बघून नाही तर गुन्हा बघुन मिळत होता. छत्रपती शिवरायांनी स्वतः च्या जातीच्या धर्माच्या लोकांना कठोर शिक्षा केली. महिलांवर वाकड्या नजरेने बघणाऱ्यांचे डोळे काढणारे छत्रपती शिवाजी महाराज यांनी जाती धर्माला नाही तर माणसाला प्राधान्य दिले. मानवतेसाठी, मानवकल्याणासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपले स्वराज्य उभे केले सर्वांना सुख समाधान दिले. हा मानवतावादी इतिहास असुनही काही विकृत राजकीय लोक छत्रपती शिवाजी महाराज यांना जाती धर्मात बंद करून त्यांचे कार्य मर्यादित करण्याचा बदमाशपणा करण्याचा प्रयत्न करत आहेत. राजकीय नेत्यांची व स्वतः लाच श्रेष्ठ समजणाऱ्या विकृत लोकांचे अस्तित्वच विषमतेवर आधारित आहे. आणि हेच विकृत लोक छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव घेऊन, चुकिचा इतिहास व दाखले देऊन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाचा वापर धर्मविरोधी करून स्वतः ची झोळी भरून घेतात. छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य हे स्वराज्यातील प्रत्येक माणसासाठी सारखेच होते. मग तो कोणत्याही जाती धर्माचा असो. जर छत्रपती शिवाजी महाराज हे एकाच जातीचे राजे असते तर छत्रपती शिवाजी महाराजांचा जनमाणसात आदर सन्मान कसा वाढला असता? विकृत लोकांकडून चुकिचा इतिहास ऐकल्यापेक्षा स्वतः इतिहास वाचला तरच छत्रपती रयतेचे कल्याणकारी राजे होते हे सिद्ध होते. छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव घेऊन राजकारण करून स्वतः ची झोळी भरणारे लोक छत्रपतींच्या विचाराने चालतात का हे डोळसपणे बघून समिक्षा करणे गरजेचे आहे. छत्रपती शिवाजी महाराज राजा असूनही प्रजेच्या हिताचे काम करत होते. आज लोकप्रतिनिधी जनतेचे सेवक असुनही जनतेला लुटत आहेत. जनतेला लुटणारा खऱ्या अर्थाने छत्रपती शिवाजी महाराज व स्वराज्याचा शत्रु आहे. आज माणूस धोक्यात आहे. शेतकरी, स्त्रिया धोक्यात आहेत, शेतकरी रस्त्यावर उतरून न्याय माघत आहे परंतु जनतेचे सेवक असलेले नेते जनतेवरच वार करत आहेत. सत्ताधारी बलात्कारी, व्यभिचारी लोकांना शिक्षेपासून सुट तर सर्व सामान्य जनतेची लुट आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे राजे असुनही जनतेचा एकही पैसा वैयक्तिक फायद्यासाठी वापरला नाही. आजचे जनतेचे सेवक स्वतः चा लिलाव करून जनतेच्या मताना आदर व समस्यांचे गांभीर्य लक्षात घेत नाहीत. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्यात जनता, महिला व शेतकरी सुखी होते. परंतु त्याच देशात छत्रपतींचे नाव घेऊन राजकारण करणारे लोक सत्तेत असतानाही जनता, शेतकरी किंवा महिला सुरक्षित व समाधानी आहेत का? आपण छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करताना फक्त फोटो ला हार घालून वंदन करून चालणार नाही तर देशातील जनतेचे सेवक हे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचाराने , संविधानाला अनुसरून, लोककल्याणकारी कामे करतात का? याचे उत्तर मिळवून व्यवस्थेला प्रश्न विचारून जनतेचे प्रश्न सोडवले तरच छत्रपतींच्या विचारातील कार्य पुर्ण होत आहे याचे समाधान व जयंती साजरी करण्याचे सार्थक होईल. जाती धर्मात छत्रपतींना बंध करून छपतींचा वापर द्वेष पसरवण्यासाठी काही विकृत लोकांकडून हानुन पाडण्यासाठी आपल्याला जागृत व्हावे लागेल. कारण छत्रपती ही कोणत्याही जाती धर्माच्या विरोधात नव्हते तर अन्याय अत्याचार व सामाजिक विषमतेविरोधात होते. सामाजिक समता प्रस्थापित करून रयतेला खऱ्या अर्थाने छत्रपती शिवाजी महाराज यांनी सुखी समाधानी केले म्हणून स्वराज्यातील प्रत्येक रयतेला छत्रपती आजही स्वतः चे वाटतात. हेच छत्रपतींचे महान कार्य आजही समाजात पेरता यावे म्हणून जयंती साजरी करून जागृती करणे गरजेचे आहे. रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त समस्त मानवतावादी लोकांना मंगलमय सदिच्छा...

***********

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता. मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

# डॉ.बाबासाहेबांनी मनमाडला दिलेला संदेश कामगार का विसरले?.

सत्ते शिवाय परिवर्तन घडविण्याची ताकद कामगार संघटनेत असते.देशात नव्हे जगात कामगार कर्मचारी आणि अधिकारी यांची संख्याबळ खूप मोठे आहे.त्याबळावर आपण जगात समतावादी विज्ञानवादी विचारांची समाज व्यवस्था व्यवस्थापन निर्माण करू शकतो.जगात ज्या काही सामाजिक,राजकीय क्रांत्या झाल्या त्या कामगारांनी केल्या असा इतिहास आहे.त्यासाठी कामगार कर्मचारी यांना आपले मित्र कोण आणि शत्रू को हे ओळखता आले पाहिजे.

रेल्वे मधील मागासवर्गीय गँगमॅन कामगारांची (दलित वर्ग) कर्मचारी दोन दिवशीय परिषद १२,१३ फेब्रुवारी १९३८ ला मनमाड येथे झाली होती. त्यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हटले होते,की भारतीय कामगारांचे दोन शत्रू आहेत.एक भांडवलशाही आणि दुसरी ब्राह्मणशाही हे विसरू नका. कोणत्याही समाजात त्या देशातील सर्वसामान्य जनतेचा जीवनमार्ग हा राजकीय परिस्थितीने घडविलेला असतो. राजकीय सत्ता जनतेच्या आकांक्षांना मूर्त रूप देत असतात.ती ज्यांच्या हातात असते त्यांना आपल्या आशा– आकांक्षांना मूर्त रूप देण्याची संधी प्राप्त होते.सत्ता त्यांचीच बटीक बनत असते. हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ओळखले होते.या देशातील काँग्रेस पक्षाचे नेतृत्व भांडवलदार,जमिनदार व ब्राह्मणवर्ग यांच्या हातात असल्याने,राजकीय सत्ता त्यांच्याच हाती जाईल व येथील दलित कष्टकरी समाज गुलामासारखा राबविला जाईल, असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते.असे होऊ नये यासाठी त्यांनी लोकशाही मूल्यांवर आधारित असणारा स्वतंत्र मजूर पक्ष १५ ऑगस्ट १९३६ साली स्थापन केला होता.त्यांचे मुख्य उद्दिष्ट हे कामगार मजुरांचे प्रतिनिधी विधिमंडळात जाणे हा होता.कारण ब्राह्मणशाही आणि भांडवलशाहीचे प्रतिनिधी हे कामगार मजुरांच्या न्याय हक्क व प्रतिष्ठेसाठी कोणते ही ठराव मांडून मंजूर करून घेणार नाहीत यांची त्यांना खात्री होती. म्हणूनच त्यांनी स्वतंत्र मजदूर पक्षाची स्थापना केली होती.कोणता ही मजूर हा स्वतंत्र असू शकत नाही. त्यासाठी त्याला स्वताची ट्रेड युनियन बनविली पाहिजे.त्यासाठी त्यांनी स्वतंत्र मजदूर युनियन स्थापना केली.त्याला डॉ.बाबासाहेबांनी १२,१३ फेब्रुवारी १९३८ मनमाडला कामगारांना दिलेला तो संदेश कामगार मजूर का विसरले आहेत?.कारण सुरक्षित टिकाणी सुरक्षित नोकरी करणारे कामगार कर्मचारी यांनी संघटनेचे महत्व समजून घेतले नाही.त्याचे परिणाम कायमस्वरूपी कामाच्या टिकाणी कंत्राटी असुरक्षित नोकरी मोठ्या प्रमाणत निर्माण होत आहे.

भारतीय कामगार कायद्यानुसार कायमस्वरूपी कामे करण्यासाठी कंत्राटी पद्धतीने कामगार ठेऊ नये तर त्याजागी कायमस्वरूपी कामगारांची नेमणूक करण्यात यावी साठी १९७५ ते १९९० पर्यंत राष्ट्रीय पातळीवर ट्रेंड युनियने कायदेशीर लढाई लढत असतांना कायमस्वरूपी कामगारांची नेमणूक करण्यात यावी असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. त्याला पळवाट काढून भांडवलदार व त्यांच्या प्रणित कामगार ट्रेंड युनियन ने ठेकेदारी अधिनियम कायद्याला जन्मा दिला.त्याला कंत्राटी कामगारांच्या भल्यासाठी असा दिशाभूल करणारा प्रचार करण्यात आला.सरकारी, निमसरकारी किंवा खाजगी कारखाने,कंपनीचे काम करणाऱ्या ठेकेदारावर कामगारांची जबाबदारी राहील असे सांगून सर्वांनीच आपली मुख्य जबाबदारी टाळली.त्यामुळेच कंत्राटी कामगार आणि राष्ट्रीय ट्रेंड युनियन घरका ना घाटका झाला आहे.

असंघटित कामगारांच्या समस्या कडे दुर्लक्ष करणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील ट्रेंड युनियनचे संघटितपणाची संघशक्ती न समजणाऱ्या असंघटित कामगारांचे मोठे नुकसान झाले.बिल्डर व ठेकेदारीचे समर्थन करणारा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने २००१ साली दिला होता.या निर्णया विरोधात राष्ट्रीय पातळीवरील ट्रेंड युनियन यांनी जायाला पाहिजे होते पण १२ राष्ट्रीय पातळीवरील ट्रेंड युनियन व एक अंतर राष्ट्रीय पातळीवरील ट्रेंड युनियन सि एफ टी यु आय यांनी या विरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मांगीतली नाही.या मागचे खरे कारण काय असेल तर बहुसंख्य मागासवर्गीय कामगारांचे जाती व्यवस्था नुसार कायमस्वरूपी आर्थिक शोषण होत राहावे. याचे वैचारिक समर्थन होय.यामुळे प्रत्येक वेळी सरकारी,निमसरकारी



खाजगी कारखान्यात कंपन्यांच्या आत चालणारे कायमस्वरूपी काम प्रत्येक वर्षी ठेकेदार बदली केल्या मुळे कामगार ही बदलावा लागतो.त्यामुळेच ठेकेदारी पद्धतीने काम करणारा कोणत्याही कामगार कोणत्याही सरकारी निमसरकारी खाजगी कारखान्यात,कंपनीत कायमस्वरूपी कामगार राहू शकत नाही. युनियन बनवु शकत नाही हा देशातील बहुसंख्य बहुजन मागासवर्गीय




ओबीसी,एस सी,एसटी,आदिवासी भटक्या जाती जमाती आणि अल्पसंख्याक समाजाच्या कामगारांवर अन्याय करणारा निर्णय झाला होता. या विरोधात स्वतंत्र मजदूर युनियन बहुजन मागासवर्गीय समाजातील कामगारात प्रबोधन करून जनजागृती करीत आहे.जे मागासवर्गीय बहुजन समाजातील कामगार या जातीव्यवस्था समर्थन करणाऱ्या ट्रेंड युनियनचे वार्षिक सभासद आहेत त्यांनी या घटनेचा गांभीर्याने विचार करून आपण कोणाचे व कोणत्या विचारधारेचे समर्थन करतो ते आज पर्यंत त्याने ठरविले नाही.महापुरुषांच्या नांवाचा जयजयकार करणारा बहुसंख्य मागासवर्गीय ओबीसी,एस सी,एस टी,भटकाविमुक्ता,आदिवासी आणि अल्पसंख्याक समाज सर्वच क्षेत्रात शैक्षणिक,सांस्कृतिक,कला क्रिडा,धार्मिक आणि राजकीयदृष्ट्या असंघटित म्हणूनच ओळखला जातो.त्याने डॉ.बाबासाहेबांनी १२,१३ फेब्रुवारी १९३८ मनमाडला दिलेला संदेश समजून घेतला असता तर आज मान्यताप्राप्त कामगार युनियनचा कायम कामगार व सभासद असता.त्याचे शासन यंत्रणेवर कायम दबाब राहिला असता.

सरकारी निमसरकारी व खाजगी कारखान्यात,कंपनीत स्थानिक कामगारांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे ठेकेदार बदली झाला तरी कामगारांना कामावरून कमी करू नये अशी राज्य व केंद्र सरकारने सुरवातीला भूमिका घेतली होती. त्यावेळी भूमिपुत्रांना प्रथम प्राधान्य असे जनआंदोलन देशभरात उभे राहिले होते. त्यातूनच अनेक राज्यात प्रादेशिक राजकीय पक्षाचा जन्म झाला.पुढे राजकिय सत्ताधारी भांडवलदारांच्या फंडिंगवर निवडणूक लढवुन निवडून येत असल्यामुळे सत्ताधारी पक्ष आणि त्यांच्या प्रणित कामगार संघटना, ट्रेंड युनियन सत्ताधाऱ्यांच्या किंवा सरकारच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात न जातात केवळ रस्त्यावरील आंदोलने करून कामगारांची दिशाभूल व फसवणूक करीत आले आहेत.राष्ट्रीय मिल मजदूर संघ ही इंटक प्रणित गिरणी कामगारांची युनियन होती.त्यांच्या पक्षाचे अनेक राज्यात व केंद्रात सरकार होते तरी मुंबई व देशातील गिरण्या बंद झाल्या व त्यांच्या जमिनीवर टोलेजंग टॉवर उभे राहून लाखो गिरणी कामगार उध्वस्त झाला.म्हणूनच बहुसंख्य कामगार ट्रेंड युनियन इंटक व राष्ट्रीय पक्षा पासुन दूर गेला.त्या पक्षाची परिस्थिती ना घरका ना घाटका अशी झाली आहे.

स्वतंत्र मजदूर युनियन गेल्या पंधरा वर्षा पासुन बहुजन समाजातील मागासवर्गीय कामगारांना सांगत आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १२ व १३ फेब्रुवारी १९३८ साली रेल्वे गँग मन कामगारांच्या कामगार परिषद समोर सांगितले होते की मागासवर्गीय समाजाच्या कामगारांनी स्वतःची ट्रेंड युनियन लवकरात लवकर स्थापन करून तिला स्वतंत्र मजदूर युनियन (आय एल यु ) या राष्ट्रीय पातळीवरील ट्रेंड युनियन शी संलग्नता स्विकारावी असे सर्व क्षेत्रातील मागासवर्गीय कामगारांना आवाहन केले होते. आज पर्यंत लाखोच्या संख्येने मागासवर्गीय कामगार,कर्मचारी अधिकारी जातीव्यवस्थेचे समर्थन करणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील ट्रेंड युनियनला वार्षिक वर्गणी देऊन आर्थिक दृष्ट्या मजबूत करतात.ते संघटीत कामगारांना असंघटित कामगार करणाऱ्या कंत्राटी कामगार कायद्याचे समर्थन करून पुन्हा जाती व्यवस्था स्थापना करण्यासाठी मदत करतात. डॉ.बाबासाहेबांनी १२,१३ फेब्रुवारी १९३८ मनमाडला दिलेल्या संदेशाकडे दुर्लक्ष केल्यामुळे असे झाले.असे लिहले व म्हटले तर चुकीचे ठरणार नाही.

राष्ट्रीय पातळीवर बारा ट्रेंड युनियन महासंघ आहेत,तरी कामगारांच्या अनेक समस्या आज जशाच्या तसा आहेत त्या सोडविण्यासाठी ट्रेंड युनियनने सनदशीर मार्गाने लढण्याची तयारी करण्या ऐवजी अयोध्या मध्ये राम मंदिर बांधकाम करण्यासाठी आंदोलन उभारण्यासाठी ट्रेंड युनियन संघटनानां पक्षांना आर्थिक मदत करतात.पण सामाजिक सुरक्षितता कायद्याच्या अंमलबजावणी साठी कोणत्याही प्रकारची जनजागृती करण्यावर भर देत नाही. सामाजिक सुरक्षिततेचे कायदे जन्माला येण्यामागे एक दूरदृष्टी होती.सेवा निवृत्तनंतर कामगारांना उर्वरित जीवन सन्मानाने सुखा समाधानाने जगता यावे यासाठी ही सामाजिक सुरक्षितता कायदे झाले.आज देशात ९३ टक्के कामगार असंघटित आहेत.त्यात ३८ करोड असंघटित कष्टकरी कामगारांची कंत्राटी कामगार म्हणून नोंद असतांना केवळ दहा टक्के कामगारांना सामाजिक सुरक्षितता कायद्याचा फायदे मिळत आहेत तर ९० टक्के कामगार हे या लाभा पासुन वंचित आहेत.हे सरकारच्या जबाबदार अधिकाऱ्याने दिलेली माहिती आहे.

देशातील संघटीत असंघटित कामगारांना न्याय हक्क व प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे ४४ कायदे चार कोड बिलात रूपांतर करून झाले आहेत.त्यांचे बिल संसदेत पडून आहे असे सांगितल्या जाते पण प्रत्यक्षात त्यांची अंमलबजावणी सार्वजनिक उधोग धंद्यात सुरू झाली आहे.रेल्वे स्टेशनवर काम करणारा सफाई कामगार,सुरक्षा रक्षक,मेल एक्सप्रेसच्या डब्यात पाणी भरणारा कामगार,कारखान्यात काम करणारा इतर कामगार हा मोठया प्रमाणात कंत्राटी कामगार भरल्या जात आहे.त्यावर राष्ट्रीय पातळीवरील ट्रेंड युनियन यांनी ज्या शक्तीने लढले पाहिजे होते त्या शक्तीने लढत नाही. गांधीवादी,गोवळकरवादी समाजवादी, मार्क्सवादी कम्युनिस्टांच्या लाल बावटा वाल्या ट्रेंड युनियन मागासवर्गीय कामगारांना खूप प्रामाणिक वाटतात. पण आम्हाला हे समजत नाही कि जातीव्यवस्था समर्थक कामगार चळवळीचे नेतृत्व करणारे नेते मागासवर्गीय कामगारांची गेट बाहेरची जात नष्ट करण्यासाठी काय करतात?. म्हणूनच डॉ.बाबासाहेबांनी १२,१३ फेब्रुवारी १९३८ मनमाडला आपल्या शत्रू व मित्राची ओळख करून दिली होती.

देशातील सर्वात जास्त कम्युनिस्ट चळवळी कामगारांच्या जोरावर चालतात.खालचे काम करणारे खास करुन त्या कामगारां पैकी बहुतांशी कामगार कर्मचारी हे मागासवर्गीय असतात. खरं तर मागासवर्गीयांना शंभर टक्के न्याय देण्याचं खरं काम बाबासाहेबांनी केलं. तर मग बाबासाहेबांच्या निळ्या झेंड्याच्या कामगार संघटना, युनियन कडे मागासवर्गीय कामगार मोठया संख्येने का जात नाही?. हा प्रश्न स्वताला आंबेडकरवादी म्हणून घेणाऱ्या कामगार,कर्मचारी अधिकारी यांना का पडत नाही. संघटित कामगारांना त्यांच्या मुलामुलींना असंघटित कामगार बनविण्यात कामगार संघटना युनियन आणि त्यांच्या महासंघाची मोठी भूमिका आहे हे समजून घेतले पाहिजे.असंघटित कामगारांना आता थोडी बुद्धी येईल अशी अपेक्षा आहे,गांवात असला तरी,शहरात असला तरी,ग्रामपंचायत,तहशील कार्यालयात कामगार म्हणून नांव नोंदणी झालीच पाहिजे,असंघटित कामगारांनी येणाऱ्या काळात संघटित न झाल्यास भविष्यात अनेक संकटांना तोंड द्यावे लागेल.कंत्राटी कामगार आणि राष्ट्रीय ट्रेंड युनियनचे आपला वैचारिक वारसा विसरल्यामुळे घरका ना घाटका झाल्या आहेत. यातुन त्यांनी काही बोध घेतला तर कंत्राटी कामगार आणि राष्ट्रीय ट्रेंड युनियन एकत्र आल्यास मोठी राजकीय कामगार क्रांती घडवू शकतात.म्हणूनच डॉ.बाबासाहेबांनी १२,१३ फेब्रुवारी १९३८ मनमाडला दिलेला संदेश कायम डोळ्यासमोर असला पाहिजे.तोच आदर्श ठेऊन दरवर्षी राज्यात अधिवेशन घेत होते यावेळी स्वतंत्र मजदूर युनियनने प्रथमच राष्ट्रीय अधिवेशन १७/१८ फेब्रुवारी २०२४ ला सुरेश भट सभागृह नागपुरात आयोजित केले आहे.त्यात जागरूक कामगार,कर्मचारी अधिकारी यांनी सहभागी व्हावे. असे आवाहन करीत आहे.

सागर रामभाऊ तायडे. ९९२०४०३८५९,भांडुप मुंबई.
अध्यक्ष सत्यशोधक कामगार संघटना,स्वतंत्र मजदूर युनियन महाराष्ट्र राज्य

# गाव तिथे बुद्ध विहार अभियान राबविणार -भिक्खू पय्यानंद थेरो

## राजा शुद्धोधन बुद्ध विहार येथे सामूहिक बुद्ध वंदना कार्यक्रम उत्साहात संपन्न



लातूर :- लातूर शहरांमध्ये सर्वच बुद्ध विहाराच्या माध्यमातून धम्म प्रसाराचे कार्य गतिमान पद्धतीने सुरू आहे. आता ग्रामीण भागामध्ये गाव तिथे बुद्ध विहार हे अभियान राबवून बुद्धाचा धम्म हा लातूर जिल्ह्यामधील सर्व खेड्यापाड्यांपर्यंत पोहोचविण्याचा उपक्रम येत्या काळामध्ये राबविण्याचा मनोदय बौद्ध धम्म प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव तथा धम्म गुरु भिक्खू पय्यानंद थेरो यांनी नुकतेच केले. दर रविवार चलो बुद्ध विहार या अभियानातर्गत लातूर शहरातील बालाजी नगर येथील राजा शुद्धोधन चॅरिटेबल ट्रस्ट द्वारा संचालित राजा शुद्धोधन बुद्ध विहार येथे सामूहिक बुद्ध वंदना कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता यावेळी ते मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी विचार मंचावर भंते बुद्ध शील आणि भंते विपस्सी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी तथागत भगवान बुद्ध आणि बोधिसत्व परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर धुप, दीप आणि पुष्पाने विनम्रपणे अभिवादन करण्यात आले. यानंतर प्रा. देवदत्त सावंत यांनी भिक्खू संघाला याचना केली. त्यानंतर बुद्ध वंदना, धम्म वंदना, संघ वंदना, २२ प्रतिज्ञा वाचन करण्यात आले. पुढे बोलताना भिक्खू पय्यानंद थेरो म्हणाले की, बौद्ध धम्माच्या प्रसार आणि प्रचार करण्यासाठी भिक्खूची भूमिका महत्त्वाची असते. मात्र भिक्खूसोबत समाजातील अभ्यासू आणि चिकित्सक बौद्ध अनुयायांनी धम्माच्या प्रसारासाठी एकत्र आले पाहिजे यासाठी भविष्यकाळात प्रयत्न करणार असून लातूर जिल्ह्याच्या धम्म चळवळीला अधिक गतिमान केली जाईल. धम्म चळवळ ही अधिक लोकाभिमुख व्हावी यासाठी समाजामध्ये उपासकाची भूमिका महत्त्वाची असते धम्माच्या प्रचारासाठी आपण समाजातील सर्व व्यक्ती, संस्था आणि संघटना यांचे सहकार्य घेणार असल्याचेही ते म्हणाले. आज संपूर्ण समाजाला धम्म विचाराची आवश्यकता आहे कारण धम्मामुळेच व्यक्तीचा व्यक्तिमत्व विकास आणि आपले आचरण समाजाभिमुख होण्यास मदत होते आणि मानवी जीवन हे विशुद्ध बनते असेही ते यावेळी म्हणाले. या कार्यक्रमांमध्ये महात्मा फुले राहुरी कृषी विद्यापीठ, राहुरी येथील डॉ. कैलास कांबळे यांनी महाविहाराला दालमिल दान दिली जाईल याची माहिती देऊन ग्रंथाचा एक संच भिक्खू पय्यानंद थेरो यांच्याकडे सुपूर्त केला तसेच डॉ. मा. ना. गायकवाड यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, प्राचार्य डॉ. संजय गवई, प्रा. देवदत्त सावंत, वसंत वाघमारे, शिलरत्न सोनवणे, विठ्ठल जाधव, सुधाकर कांबळे, ज्योतीराम लामतुरे, राहुल शाक्यमुनी, पांडुरंग अंबुलगेकर, अनिरुद्ध बनसोडे, उदय सोनवणे, सतिश मस्के, शोभा सोनकांबळे, पंचशीला बनसोडे, मिना कदम, शंकूतला नेत्रगांवकर, सरिता बनसोडे, कविता धावारे, सुमन उडानसिंग, बेबीताई कांबळे, दबडे यांच्यासह बालाजी नगर येथील बौद्ध उपासक उपासिका मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. आनंद सोनवणे यांनी केले तर आभार मिलिंद धावारे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी गौतम सूर्यवंशी, सूर्यकांत दांडे, विक्रम चिकाटे, हेमंत जाधव, राजकुमार राऊत, धम्मरत्न सोनवणे, दगडू साळवे, राजकुमार कांबळे, विशाल कांबळे, विनोद धांडे, संघपाल दांडे आदींनी परिश्रम घेतले.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त किनवट येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन:

किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती किनवट च्या वतीने शिवजयंती निमित्त दिनांक १२ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारी पर्यंत विविध कार्यक्रम ची आयोजन करून शिव सप्ताह सोहळा साजरा करण्यात येत आहे. कर्ण कर्कश बाजणारे डीजे यावर अश्लील पणे थिरकणारी तरुणाई या परंपरेला फाटा देऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांना अभिप्रेत अशी सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक उपक्रमाचे आयोजन करून शिवजन्मोत्सव साजरा करण्यात येत आहे. यासाठी सात दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. शिवजन्मोत्सव २०२४ या उत्सवामध्ये महाराज चौक, किनवट येथे वक्तृत्व व चित्रकला रंगभरण स्पर्धा सकाळी ७:०० जास्तीत जास्त शिवप्रेमींनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आव्हान छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक शिवजयंती उत्सव समि ती किनवट च्या वतीने करण्यात येत आहे. शिव सप्ताह कार्यक्रमांमध्ये दि.१२ फेब्रुवारी २०१४ रोजी, मिजन्मोत्सव गोकुंदा येथे विविध अकॅडमी व स्पर्धा केंद्र मध्ये स्पर्धा परीक्षा संपन्न झाली., दि.१६ ते १८ फ ब्रुवारी पर्यंत गाव खेडे वाडी तांड्यावर जाऊन छत्रपती शिवरायांच्या विचार व कार्यकर्तृत्वाचा जागर रथयात्रा चे आयोजन करण्यात आले आहे, दि. १९ फेब्रुवारी रोजी, छत्रपती शिवाजी ते ११:०० वा या वेळेत आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन व




ध्वजारोहन कार्यक्रम होईल. त्यानंतर गोंडराजे मैदान येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन. विशेष आकर्षण जोश उत्साह प्रेरणा देणारे वाद्य सायंकाळी ५:०० वाजता ढोलताशा पथक संचलन आयोजन. सत्यपाल महाराजांचे शिष्य सप्तखंजेरीवादक संदीपपाल महाराज यांचा समाजप्रबोधनात्मक सप्त खंजेरी वादक खणखणीत कार्यक्रम होणार आहे.

# मराठवाड्यातील युवक-युवतींसाठी २३ व २४ फेब्रुवारीला लातूर येथे विभागीय भव्य नमो महारोजगार मेळावा व करिअर मार्गदर्शन शिबीर

## ऑनलाईन नाव नोंदणीसाठी संकेतस्थळ कार्यान्वित

मुंबई :- राज्य शासनाने प्रत्येक महसुली विभागामध्ये नमो महारोजगार मेळावा व करिअर मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार मराठवाड्यातील युवक-युवतींसाठी करिअर मार्गदर्शन शिबीर आणि विभागीय नमो महारोजगार मेळावा अनुक्रमाने २३ व २४ फेब्रुवारी २०२४ रोजी लातूर येथे होणार आहे. या मेळाव्यामध्ये सहभागी होण्यासाठी ऑनलाईन नोंदणीकरिता हे संकेतस्थळ कार्यान्वित करण्यात आले आहे. तरी मराठवाड्यातील सर्व आठही जिल्ह्यातील युवक-युवतींनी रोजगाराच्या संधींचा लाभ घेण्यासाठी या संकेतस्थळवर ऑनलाईन नाव नोंदणी करण्याचे आवाहन राज्याचा कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि लातूर जिल्हा प्रशासनाने केले आहे. लातूर शहरातील महिला तंत्रनिकेतन समोरील मैदानावर आयोजित नमो महारोजगार मेळावा आणि करिअर मार्गदर्शन शिबिरात मराठवाड्यातील आठही जिल्ह्यातील युवक-युवतींना एकाच छताखाली रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासोबतच रोजगार, स्वयंरोजगारातील नवीन संधींची ओळख करून देण्यात येणार आहे. यामध्ये २३ फेब्रुवारी रोजी करिअर मार्गदर्शन शिबीर होणार आहे. तसेच २४ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या महारोजगार मेळाव्यात विविध उद्योजक,




व्यावसायिक प्रत्यक्ष उपस्थित राहून त्यांच्याकडे असलेल्या रिक्त पदांच्या संख्येनुसार युवक-युवती यांची मुलाखतीद्वारे निवड करतील. २३ फेब्रुवारीला मार्गदर्शन शिबिरातून मिळणार करिअरच्या नवीन वाटांची माहिती दहावी, बारावी किंवा पदवी, पदव्युत्तर शिक्षण घेतल्यानंतर व्यवसाय, स्वयंरोजगाराच्या संधी, करिअरच्या नव्या वाटांची माहिती युवक-युवतींना व्हावी, यासाठी नमो महारोजगार मेळाव्याच्या पहिल्या दिवशी, २३ फेब्रुवारी रोजी करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये विविध क्षेत्रातील नामांकित आणि तज्ज्ञ व्यावसायिक, उद्योजक यांचे मार्गदर्शन होणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), कृषि उद्योग, पर्यटन, आर्थिक गुंतवणूक, नर्सिंग यासारख्या विविध क्षेत्रातील रोजगार, स्वयंरोजगारातील संधीविषयी व्याख्यान, चर्चासत्र आदी कार्यक्रम होतील. तसेच रोजगार आणि स्वयंरोजगारासाठी विविध शासकीय विभाग, बँकामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांची माहितीही दिली जाणार आहे. २४ फेब्रुवारी रोजी भव्य महारोजगार मेळाव्यातून रोजगाराच्या संधी नमो महारोजगार मेळाव्यामध्ये मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर शहरासह राज्यातील विविध ठिकाणहून उद्योजक उपस्थित राहून शैक्षणिक पात्रता व मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करणार आहेत. यासाठी २४ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ९ पासूनच लातूर शहरातील बार्शी रोडवरील महिला तंत्रनिकेतन समोरील मैदानावर मुलाखतींचे आयोजन करण्यात आले आहे. इयत्ता दहावी, बारावी, तसेच विविध विषयातील पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, आयटीआय (सर्व ट्रेड) आदी शैक्षणिक पात्रताधारक उमेदवार या मेळाव्यासाठी ऑनलाईन नोंदणी करू शकणार आहेत. रोजगार मेळाव्यासाठी येथे करा ऑनलाईन नोंदणी मराठवाड्यातील युवक-युवतींनी लातूर येथे आयोजित नमो महारोजगार मेळावा व करिअर मार्गदर्शन शिबिरात उपलब्ध रोजगाराच्या संधींचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन नावनोंदणी करावी. ऑनलाईन नाव नोंदणीसाठी हे संकेतस्थळ (क्यू आर कोडसह) कार्यान्वित करण्यात आले आहे. यामध्ये 'उमेदवार' पर्याय निवडून लॉगीन करावे. त्यानंतर वैयक्तिक माहिती, ई-मेल आयडी, भ्रमणध्वनी क्रमांक, आधार क्रमांक, महास्वयंम नोंदणी क्रमांक यासह इतर माहिती भरून छायाचित्र, सी.व्ही. (बायोडाटा) अपलोड करावा.

# भाजपाचे काही आमदार, खासदार आमच्या संपर्कात



लोणावळा : शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांमध्ये उभी फूट पाडल्यानंतर भाजपाने नुकताच काँग्रेसला धक्का दिला आहे. राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अशोक चव्हाण यांना आपल्या गोटात ओढत भाजपाने त्यांना राज्यसभेची उमेदवारी दिली आहे. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर अशोक चव्हाण भाजपासोबत जाणे हा काँग्रेससाठी मोठा धक्का मानला जात आहे. दरम्यान, फोडाफोडी करून इतर पक्षांमधील नेत्यांना आपल्या पक्षात घेणा-या भाजपामध्येच पुढच्या काही दिवसांत फूट पडणार असल्याचे संकेत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिले आहेत. भाजपाचे काही आमदार आणि खासदार आमच्या संपर्कात असून, योग्य वेळी आम्ही हातोडा मारू, असे नाना पटोले यांनी म्हटले आहे.लोणावळा येथे झालेल्या काँग्रेसच्या दोन दिवसीय राज्यस्तरीय शिबिरानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना नाना पटोले म्हणाले की, भाजपाचे काही विद्यमान आमदार आणि खासदार आमच्या संपर्कात आहेत. जेव्हा आम्ही हातोडा मारू तेव्हा तुम्हाला ते दिसेलच. मात्र आमच्यासाठी ही महत्त्वाची बाब नाही. आमच्यासाठी सध्या ज्या प्रकारे महाराष्ट्र पेटवण्याचं पाप भारत जलाओ पार्टीने केलं आहे. या भारत जलाओ पार्टीला महाराष्ट्र पेटवण्याचा काय अधिकार आहे. त्यामुळे भाजपाचे जे विद्यमान आमदार, खासदार आमच्यासोबत येण्यास इच्छुक असतील त्यांच्याबाबत वेळेनुसार निर्णय घेऊ, असे नाना पटोले यांनी सांगितले.दरम्यान, या चिंतन शिबिरामध्ये संबोधित करताना नाना पटोले म्हणाले होते की, लोणावळ्यात दोन दिवसांच्या शिबिरातून चांगले बौद्धिक व वैचारिक मंथन झालेले आहे. काँग्रेसचा कार्यकर्ता असल्याचा अभिमान बाळगून काम करा. काँग्रेस पक्ष संपूर्ण राज्यात एकजूट असला पाहिजे. सर्व सेल, फ्रंटल संघटना सर्वांनी सोबत असले पाहिजे. पक्षाच्या अजेंड्यावरच सर्वांनी काम केले पाहिजे व काँग्रेसचा कार्यकर्ता म्हणून पक्षाच्या अजेंड्यानुसारच काम करा आणि लोकसभेची लढाई जिंकायची आहे हा संकल्प घेऊनच जा. आता आपल्याकडे वेळ नाही, युद्धपातळीवर काम करायचे आहे. भाजपा कसे खोटे बोलत आहे, जनतेची फसवणूक करत आहे हे लोकांमध्ये जाऊन सांगा, कुठेही कमी पडू नका. आघाडीला विजयी करून भाजपाचा पराभव करावा लागणार आहे. वातावरण काँग्रेस व मविआच्या बाजूने आहे. नरेंद्र मोदींच्या सत्तेचे दरवाजे महाराष्ट्र बंद करू शकतो, हे लक्षात घ्या, असा दावाही नाना पटोले यांनी केला.

# कोट्यवधींच्या निधीनंतरही स्वच्छतागृहांची दैना

मुंबई : प्रतिनिधी राज्याची जीवनवाहिनी असलेल्या एसटीच्या स्थानकांसह त्यातील स्वच्छतागृहांच्या स्वच्छतेसाठी ५०० कोटींहून अधिक निधी उपलब्ध झाल्यानंतरही या स्वच्छतागृहांतील स्वच्छतेचा दर्जा खालावलेला आहे. यामुळे एक मार्च ते ३१ मार्च दरम्यान विशेष तपासणी मोहीम हाती घेण्याचा निर्णय एसटी महामंडळाने घेतला आहे. यासाठी महामंडळाने १० निकष जाहीर केले असून, त्यानुसार स्वच्छता नसल्यास आगार व्यवस्थापकांवर कारवाई केली जाणार आहे.ठाण्यातील खोपटमध्ये ५,१५० ई-बस लोकार्पण कार्यक्रमावेळी मुख्यमंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष एकनाथ शिंदे यांनी स्वच्छतागृह, विश्रांतीगृहांची पाहणी केली. यावेळी त्यांनी स्वच्छतेच्या स्थितीबाबत नाराजी व्यक्त केली. एप्रिलमध्ये सुट्यांचा हंगाम सुरू होणार असल्याने प्रवाशांचा राबता अधिक असण्याची शक्यता आहे. यामुळे मार्चमध्येच एसटी स्थानकांची विशेषत: स्वच्छतागृहांसाठी तपासणी मोहीम हाती घेण्यात आली आहे. एसटीच्या मध्यवर्ती कार्यालयातील अधिकारी-कर्मचा-यांकडून अचानक भेटीद्वारे राज्यातील सर्व स्थानक-आगारांतील स्वच्छतागृहांच्या दर्जाचा आढावा घेण्यात येणार आहे. यांसह एसटी चालक-वाहकांसाठीच्या विश्रांतीगृहातील स्वच्छतागृहांची तपासणीही करण्यात येणार आहे, असे महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी सांगितले.



अस्वच्छता असल्यास काळ्या यादीत

स्वच्छतागृहांच्या स्वच्छता, टापटीपपणा यामध्ये कमतरता असल्याचे आढळल्यास संबंधित संस्थेवर कारवाई करण्यात येणार आहे. दंडात्मक कारवाई, कंत्राट रद्द करणे, काळ्या यादीसाठी शिफारस अशा प्रकारची कारवाई असेल. तपासणी करणा-या अधिका-यांना कारवाईचे अधिकार आहेत. अस्वच्छ स्वच्छतागृहे आढळलेल्या संबंधित आगार व्यवस्थापकावर शिस्त व अपील कार्यपद्धतीनुसार कारवाई करण्यात येणार आहे. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर एसटी स्थानक मोहिमेनुसार १ मे ते ३१ डिसेंबर २०२३चा अहवाल जाहीर करण्यात आला. मुंबईतील सहा स्थानकांतील स्वच्छता मध्यम स्वरूपाची आहे. ठाण्यात १३ स्थानकांपैकी ८ स्थानके ५० पेक्षा कमी गुण मिळवत नापास झाले. खोपटला स्वच्छतेसाठी ५९ गुण मिळाले. तपासणीसाठीचे निकष - स्थानक स्वच्छतागृहांची किरकोळ डागडुजी, नळ-पाण्याची व्यवस्था, परिसराची स्वच्छता व टापटीपपणा - स्वच्छतागृहातील टाईल्स (फरशी) विशेष ॲसिड अथवा फिनाईल वापरून डागमुक्त असणे - स्वच्छतागृहांचे संचालन करण-या संस्थेतील प्रतिनिधींसाठी गणवेश - स्वच्छतागृहांच्या परिसरात पुरेशी प्रकाशव्यवस्था - पाण्याच्या साठवणुकीसाठी पुरेशा क्षमतेची पाण्याची टाकी - स्वच्छतागृहांच्या दाराचे कडी-कोयंडे, पाण्याचा नळ, वापरावयाच्या बादल्या, खिडक्यांची स्थिती स्वच्छता करत नसतील तर निलंबित करा, मुख्यमंत्री शिंदेंकडून अधिका-यांची कानउघाडणी - एका स्वच्छतागृहाची ३ वेळा ॲसिड, फिनाईल वापरून ब्रशने स्वच्छता - आगार व्यवस्थापकांकडून कार्यक्षेत्रातील स्थानकातील स्वच्छतागृहांची तपासणी - विभागीय अधिका-यांकडून कार्यक्षेत्रातील आगारांच्या स्वच्छतागृहांची तपासणी - स्वच्छतागृहांच्या परिसरातील रंगरंगोटीची जबाबदारी संचालन करणा-या संबंधित संस्थेला देणे ५० पेक्षा कमी गुण- १९१ स्थानके५१-७० गुण -३१७ स्थानके ७० पेक्षा अधिक गुण -५६३ स्थानके

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE